वर्ष ४१ अंक १०

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
|| मराठी तितुका मेळवावा ||

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र**

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक   ऑक्टोबर २०२१

## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

श्रावण संपत आला की, आपसूकच मन गणरायाच्या आगमनाची वाट बघायला लागतं. मनातल्या मनात आपली आरास करून झालेली असते. अजून बाजारातही न आलेली गणेशाची मूर्ती आपल्या मनातल्या देखाव्यात स्थानापन्न झालेली असते. नैवेद्याच्या फर्माईशी तर घरातून आधीच सुरू झालेल्या असतात. गणपतीचे आगमन होणार या नुसत्या कल्पनेनेच मनाचा कोपरान् कोपरा उजळलेला असतो. यंदाच्या गणेशोत्सवाची सुरुवातही नेहमीप्रमाणे अशीच मनापासून झाली आणि बघता बघता गणरायाने आपला निरोप घेतलासुद्धा आणि जाताजाता वर्षभराची ऊर्जा देऊन गेला.

या गणेशोत्सवाच्या निमित्ताने सगळ्या मराठी मंडळांना छायाचित्रे पाठवायला सांगितली त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. एकमेकांपासून कित्येक मैल दूर असलेल्या मनांना एकत्र आणण्याची गणेशोत्सवामागील टिळकांची संकल्पना अशारीतीने अजूनही यशस्वी होते आहे. मंडळी, खरं तर भारतीय संस्कृतीमध्ये सणावारांचे प्रयोजन मनाला सतत उत्साही ठेवणे आणि मनावर नैराश्याची काजळी चढू न देणे हेच असावे. परंतु हा झाला आपला पारंपरिक मार्ग. पण म्हणतात ना 'व्यक्ति तितक्या प्रकृती' या म्हणीप्रमाणे आजकाल बदलत्या जगात मानसिक स्वास्थ्य जपण्याची प्रत्येकाची गरज वेगळी आहे. ती ओळखून सुदृढ मानसिक आरोग्यासाठी वेगवेगळे उपाय आपल्यासमोर आणण्याचा आमचा सतत प्रयत्न असतो. त्यापैकीच एक म्हणजे 'Pranic healing and mental well Being' च्या नुकत्याच झालेल्या व्याख्यानाला नेहमीप्रमाणेच उत्तम प्रतिसाद मिळाला.

आता आपला आवडता, सर्वांच्या औत्सुक्याच्या विषय म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आगामी अधिवेशनाची तयारी. आनंदाची बातमी म्हणजे, अधिवेशनाला 'Planet M'चे प्रायोजकत्व मिळाले आहे. कोविड काळात मिळालेल्या या पाठिंब्यामुळे आमचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

मंडळी, या महिन्यातल्या उत्साही बातम्यांना एक दुःखाची किनारही आहे. ती म्हणजे अशोक सप्रे यांच्या निधनाची! लॉस ॲंजलीस मधील तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळ व एकंदर उत्तर अमेरिकेतील मराठी बांधवांसाठी उत्तररंग प्रकल्पाद्वारे केलेल्या कामासाठी अशोकजी नेहमीच स्मरणात राहतील. अशोकजी व त्यांच्यासारख्या अनेकांनी या मातीत सांभाळून ठेवलेला मराठीचा दिवा अधिक प्रखर करण्याचे काम आपल्याला करायचे आहे. त्याला सर्वांची साथ मिळेल यात शंका नाही!

कळावे लोभ असावा!

आपली नम्र,

- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org

## या अंकात...

| | पान क्र. |
|---|---|
| - बृ.म. मंडळाच्या उत्तररंग प्रकल्पाचे जनक डॉ. अशोक सप्रे यांचे निधन | २ |
| - 'लेखक तुमच्या भेटीला' | |
| - बृ. म. मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता | ३ |
| - उत्तर अमेरिकेतील गणेशोत्सवाची झलक... कांही मराठी मंडळांतून फेरफटका | ४-९ |
| - चित्र-कल्पना | ९ |
| - उत्तररंग- सत्र क्रमांक ६७- संक्षिप्त अहवाल | १० |
| - पुरवणी ई विभाग- गणेशोत्सव-काही क्षणचित्रे | |
| उत्तररंग:- आठवणी माझ्या गावाच्या | |
| For Kids:- Game -Bigger than Big | |
| - BMM YuvaVani - Newsletter | |
| - राशिभविष्य:- ऑक्टोबर २०२१ | |
| -Business Advertisements | ११-१२ |

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer - Sona Bhide**
**3574 S. Marion Way, Chandler, AZ 85286**
Ph- (480) 812-9511 (PST) Email- sona.bhide@bmmonline.org
**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription


**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

**सदस्य :** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

**सदस्य :** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:** https://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com or vinatak.bmmvrutta@gmail.com

Address: 3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503


## बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या उत्तररंग प्रकल्पाचे जनक डॉ. अशोक सप्रे यांचे निधन

अमेरिकेतील मराठी समाजाला निवृत्तीनंतर 'उत्तररंग' या संकल्पनेद्वारे एक दिशा दाखवणारे डॉ. अशोक रघुनाथ सप्रे यांनी मंगळवार दिनांक १४ सप्टेंबर २०२१ रोजी वयाच्या ७८व्या वर्षी अत्यंत शांतपणे आपल्या सर्वांचा निरोप घेतला.



नऊ महिन्यांपूर्वी त्यांना पल्मनरी फायब्रोसिस या आजाराचे निदान झाले होते. त्यानंतर त्यांनी अत्यंत धीराने आणि आनंदी वृत्तीने या आजाराशी सामना केला.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने उत्तर अमेरिकेतील सर्वच मराठी आणि भारतीय समाजासाठी उत्तररंग म्हणजे आयुष्याचा उत्तरार्ध सत्कारणी कसा घालवावा, यासाठी त्यांनी सभा, परिषदा आणि मेळावे घेऊन भारतीय समाजात आपल्या निवृत्तीनंतरच्या प्रश्नांबद्दल जागृती निर्माण केली. मराठी अधिवेशनात उत्तररंग विषयक एक दिवसाची परिषद घेण्याची प्रथा अशोक सप्रे यांनी सुरू केली. त्यांचे सामाजिक कार्य, दिलखुलास व्यक्तिमत्व, प्रेमळ गपिष्ट स्वभाव, दूरदर्शीपणा, अत्यंत नेमकेपणे आणि नेटकेपणे प्रकल्प करण्याची हातोटी, यामुळे ते सर्व वयाच्या आणि स्वभावाच्या लोकांचे जगन्मित्र होते.

त्यांच्या मागे पत्नी विद्या हर्डीकर सप्रे, दोन मुली नंदिता आणि मोनिका, जावई जॉन आणि तीन नातवंडे (देवेन, लीना आणि केलसी) आहेत.

त्यांच्या स्मरणार्थ ज्ञानप्रबोधिनी फौंडेशन या संस्थेला देणगी पाठवल्यास त्याचा विनियोग फुफुसांचे विकारांना बळी पडणाऱ्या भारतातील बिडी कामगार महिलांसाठी केला जाईल. त्यासाठी www.jnanaprabodhinifoundation.org या संकेतस्थळावर देणगी देण्याची व्यवस्था आहे.

सप्रे कुटुंबीयांप्रत आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी **sapre@aol.com** ईपत्त्यावर ईमेल पाठवावी.


## 'लेखक तुमच्या भेटीला'

**Live on BMM Facebook & YouTube**
**भाग १३:**-सप्टेंबर २५, २०२१ सकाळी ११-११:३० CST
**लेखक:- अर्चना मेढेकर-मराठे** (टोरांटो, कॅनडा)
**संवादक:- शिल्पा कुळकर्णी** (बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्)
**यूट्युब लिंक:-**
**https://www.youtube.com/watch?v=AXPvwAuO7Q4**

## मराठी विश्व (न्यूजर्सी) संयोजित बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता

### ऑगस्ट ११ ते १४, २०२२ - अटलांटिक सिटी, न्यू जर्सी

**- प्रशांत कोल्हटकर** (बृ. म. मं. अधिवेशन २०२२, न्यूजर्सी, संयोजन-प्रमुख)



वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा

मांगल्याचे प्रतीक आणि कार्य सिद्धीस नेणाऱ्या मंगलमूर्तीला वंदन करून बृ. म. मं. (बीएमएम) २०२२ अधिवेशनाच्या तयारीचा एक नवीन आढावा घेऊन मी पुन्हा आपल्यासमोर आलो आहे.

गणपती हे महाराष्ट्राचे प्रिय आराध्यदैवत आहे. आपले इच्छित कार्य सफल व्हावे यासाठी सर्वप्रथम गणपतीचे पूजन करून त्याचे शुभाशीर्वाद घेतले जातात. नुकताच संपन्न झालेला गणेशोत्सव, बऱ्याच मराठी मंडळांनी तो आभासी (virtual) साजरा केला तर काही मंडळांना वैयक्तिकरित्या साजरा करण्याची संधी मिळाली. भव्य डेकोरेशन, ढोल ताशा, आरास स्पर्धा इत्यादी कार्यक्रम सर्व CDC COVID प्रोटोकॉल पाळून जवळपास सर्व मंडळांनी गणेशोत्सव दिमाखात साजरा केला. गणेशोत्सव म्हणजे नुसती साग्रसंगीत पूजा आणि ढोल-ताशा यांचा गजर असे नव्हे, तर आपण आपल्या चेतनेतील श्री गणेशाची प्रार्थना करतो की, त्याने आपल्यासमोर मूर्तीच्या रूपात यावे; जेणे करुन आपण काही काळ त्याच्याशी रममाण होऊ शकू, हसत खेळत संवाद साधू शकू.

बाप्पाच्या आशीर्वादाने गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर **प्लॅनेट मराठी** सोबत **Title Sponsor** म्हणून करार केल्याची घोषणा करताना मला अतिशय आनंद होत आहे. यासह, आम्ही इतर २ प्रायोजकांशी करार पूर्ण करण्यात यशस्वी झालो आहे. **मांडके ब्रदर्स** बीएमएम २०२२ साठी **गो ग्रीन प्रायोजक (Go Green Sponsor)**असतील तर **A S Agri and Aqua LLP** रजत प्रायोजक (**Silver Sponsor**) असतील.

सप्टेंबर महिन्यात गणपती बाप्पाच्या सहवासातील दिवस कसे जादूमय झाले होते. सगळीकडे प्रचंड उत्साह आणि धम्माल. आम्हीसुद्धा आपल्या लाडक्या बाप्पाकडे साकडं घातलंय, बीएमएम २०२२ च्या तयारीच्या यशस्वी वाटचालीसाठी! बीएमएम आणि मराठी विश्व, न्यू जर्सी टीमने थीम गाण्याचा नवीन व्हिडिओ लाँच केला आहे. तो पाहण्यासाठी यू ट्युब लिंक:
**https://www.youtube.com/watch?v=QJr9W4ihgqw**

बीएमएम टीमने हाती घेतलेले बऱ्याच प्रकल्पांचे काम रीतसर चालू आहे. त्यात असंख्य स्वयंसेवकांचा हातभार आहे. सर्वांबरोबर एकजुटीने व सामंजस्याने काम करण्यात जी मजा येते, किंवा समाधान मिळते ते स्वयंसेवकच सांगू शकेल. मला नेहमीच विविध क्षेत्रातील सर्वोत्तम लोकांना भेटण्याची संधी मिळत असते. त्यांची प्रतिभा, बांधिलकी आणि त्यांची काम करण्याची वृत्ती मला नेहमीच प्रेरणा देऊन जाते आणि बरंच शिकता येते.



या अधिवेशनासाठी काही नवीन उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी एक उपक्रम **'एज्युकेशन समिट'** बीएमएम व्यासपीठाचा भारतातील आणि अमेरिकेतील युवक-युवतींना दूरगामी फायदा व्हावा, यासाठी भारतातील विद्यापीठे आणि उत्तर अमेरिकेतील विद्यापीठे यांच्यात शिक्षणाच्या सर्व आघाड्यांवर आणि त्यातील विविध

घटकांमध्ये कशी लक्षणीय प्रगती करावी, यावर संभाषण आणि चर्चा आयोजित केली जाईल. अनेक विद्यापीठांनी या उपक्रमात सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. यात आम्हाला **श्री. मुकुंद चोरघडे** आणि **श्री. मुकुंद कर्वे** मोलाचे मार्गदर्शन करीत आहेत.

तसे बरेच काही करायचा बेत आहे, अनेक चुलींवर बरेच काही शिजत आले आहे, पण तरी पानात पडण्यास आणि त्याचा आस्वाद घेण्यास अजून थोडा वेळ लागेल, अशी परिस्थिती आहे. बीएमएम अधिवेशनातील कार्यक्रमांबाबत जशी तुम्हाला माहिती करून घेण्याची उत्सुकता आहे, त्याहून अधिक उत्सुकता आम्हाला ही माहिती तुमच्यापर्यंत पोहचवण्याची आहे. काही आठवडयातच आम्ही आमच्या सोशल मीडिया चॅनेल्सद्वारे तुमच्यापर्यंत ही माहिती पोहोचवू.

या अधिवेशनाच्या निमित्ताने आम्ही तीन स्पर्धा आयोजित करत आहोत. **नाट्यरंग** (एकांकिका स्पर्धा)
**नृत्यरंग** (समूह किंवा सांघिक नृत्य स्पर्धा)
**स्वररंग** (गायन स्पर्धा)
याबद्दल आणि अधिवेशनाविषयी अधिक माहितीसाठी - **bmm2022.org** या संकेतस्थळाला भेट द्या.

प्रत्येक उगवता दिवस एक नवीन आशा, एक नवीन स्वप्न घेऊन जन्माला येतो त्याचप्रमाणे प्रत्येक महिना आपल्या बीएमएम २०२२च्या अधिवेशनाकडच्या वाटचालीचा प्रगतीचा पुढचा टप्पा गाठतो आणि त्याचा नवीन आढावा घेऊन मी परत पुढच्या महिन्यात तुमच्यासमोर येईन. चला तर मग आता तुमचा इथेच निरोप घेतो. Welcome to BMM 2022!

***

# उत्तर अमेरिकेतील गणेशोत्सव २०२१- झलक- (कांही मराठी मंडळातून फेरफटका)

## महाराष्ट्र मंडळ अॅटलांटा
## “दर्शन मात्रे मन”...

**- वैभव साठे** (सुवानी-जॉर्जिया)

२०२० हे वर्ष जगभर सर्वांना कासा“वीस” करणारं ठरलं. कित्येक लोकांनी आपले जवळचे लोक, नोकऱ्या, व्यवसाय तर गमावलेच पण आपल्याला घरातून बाहेर पडून भरभरून कसं जगावं हे ही विसरायला झालंय. सण-वार, लग्न, वाढदिवस हे सर्वच संपूर्णपणे रद्द किंवा तोंडाला मुखपट्ट्या बांधून अत्यंत कमी प्रमाणात केले गेले. अर्ध्याहून अधिक २०२१ गेले, लसीकरण झाले (आपण इथे फक्त सुशिक्षित आणि विवेकी लोकांबद्दल बोलत आहोत) तरीही मुखपट्ट्या आणि टाळेबंदी काही जायचं नावंच घेत नाहीये. या अशा सर्व गदारोळात गणपती करायचा की, नाही अशी चर्चा आमच्या अॅटलांटाच्या महाराष्ट्र मंडळात (MMA) काही महिने चालू होती.

थांबा थांबा, with full disclosure, आमच्या अॅटलांटात २०२१ साली महाराष्ट्र मंडळ समितीच नाही. २०२० मध्ये मोठ्या उत्साहाने जमलेल्या समितीला कोव्हिड परिस्थितीमुळे काहीच करता न आल्याने आणि २०२१ मध्ये कोरोनाच्या भीतीने कुणीच पुढे न आल्याने सर्व मंडळ ‘auto cruise’ वर चालू होते. पण मंदार वेंगुर्लेकर आणि राजीव घांग्रेकर या MMA च्या विश्वस्तांनी आपण गणपती करायचाच या ठाम निर्धाराने या वर्षी पहिला कार्यक्रम करायचाच असे ठरवले. गेली बरीच वर्षे बाराशे ते पंधराशे लोकं, ढोल ताशा, लेझिम, रंगमंचावरील कार्यक्रम, नाटक, नाच, गाणी आणि दोन तास चालणारी मिरवणूक अशी आम्हाला सवय झालेली. या वर्षी जेमतेम शंभर दीडशे लोक जमली तरी चालेल, but the show must go on! असे ठरले होते. या वर्षी सर्वांना मोफत प्रवेश ठेवला होता.



१८ सप्टेंबरला लेक सिटी मधील शक्ती मंदिरात सालाबादप्रमाणे श्रींची स्थापना झाली. सकाळी वैभव साठे यांनी यथासांग प्राणप्रतिष्ठापना केली आणि हजर मंडळींनी अथर्वशीर्ष आणि आरती केली. या वर्षी बरेच नवीन चेहरे आले होते. लवकरच त्यांच्या ओळखी होऊन गटही तयार झाले. शक्ती मंदिरातच बनवलेल्या चविष्ट गुजराथी जेवणाचा आस्वाद घेऊन दुपारचे रंगमंचावरचे तीन कार्यक्रम झाले. वृषाली तेरणीकरांनी नृत्यबद्ध केलेला आधुनिक “छबीदार छबी” आणि अमित पवार यांनी नृत्यबद्ध केलेल्या अप्रतिम नृत्यांनी दर्शकांचे मनोरंजन केले. **(For glimpses, Click HERE to see few photos.)**

संध्याकाळी मनोभावे महाआरती केल्यानंतर श्रींची विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली. कोरोनाच्या सावटाखालीही लेझिम प्रेमी लोकांनी छान नाच बसवलेला होता. मात्र एकदाचा नाशिक ढोल सुरु झाल्यावर सर्वांमध्यें एक स्फुरण संचारले आणि उस्फूर्त “गणपती नाच” सुरू झाले. विसर्जनानंतर तृप्त मनाने भक्तगण घरी गेले ते पुढच्या वर्षी लवकर आणि धुमधामीत या अशी प्रार्थना करीतच!

***

## कोलम्बस गणेश मंडळ
## "ओंकार २०२१"

- **हर्शल केसकर** (कोलम्बस, इंडियाना)

कोलंबस गणेश मंडळाने सार्वजनिक गणेशोत्सवाच्या १७व्या वर्षात पदार्पण केलं. कोणताही सण, साजरा करण्यासाठी लोक एकत्र आल्याशिवाय अपूर्णच वाटतो. त्यामुळे २०२० ची मरगळ झटकून या वर्षी "नॉन-व्हर्च्युअल" पद्धतीने उत्सव साजरा करावा, अशी मंडळ कार्यकर्त्यांची इच्छा होती. अखेरीस योग्य नियोजन आणि आवश्यक खबरदारी घेऊन, "back to normal" गणेश उत्सव **"ओंकार २०२१"**, ९ ते १२ सप्टेंबर असा ४ दिवस दिमाखात साजरा करण्यात आला.

कोलंबस! इंडियाना राज्याच्या मध्यभागी स्थित, ५०,००० लोकसंख्या असलेले हे एक लहानसे गाव. पण गणेश उत्सव साजरा करताना मात्र येथील भारतीय समुदायाचा उत्साह अगदी ओसंडून वाहतो. कोलंबस गणेश मंडळाची स्थापना २००५ मध्ये झाली आणि तेव्हापासून मंडळ भव्य सार्वजनिक गणेश उत्सव साजरा करत आहे.

श्रीगणरायाची प्रतिष्ठापना शहराच्या डाउनटाउन मधील एका प्रशस्त अशा कम्युनिटी इव्हेंट सेंटरमधे केली गेली. या वर्षी मंडळाने "गरुडावर बसलेला गणपती" असा हलता देखावा सादर केला होता.



पहिल्या दिवशी श्रीगजाननाची शास्त्र शुद्ध पध्दतीने षोडशोपचार पूजा आणि प्रतिष्ठापना करण्यात आली. भाविकांच्या सहवासात आरती करून, तीर्थ-प्रसाद वाटपाने दिवसाची सांगता झाली.

दुसरा दिवस गायनसेवेचा होता. गावातील प्रतिभावान गायकांनी मराठी आणि अमराठी भजने, अभंग, भक्तिगीते सादर केली. त्यांना सुमधूर साथ होती तबला, बासरी आणि हार्मोनियमची.

तिसऱ्या दिवशी सकाळी पंधरा कुटुंबांनी मंडळाच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सत्यनारायण-पूजा केली. त्यानंतर विष्णू-सहस्त्रनाम- पठण आणि आरती झाली.

संध्याकाळी उत्सव रस्त्यावर ओसंडला. डाउनटाउनमधील एक रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता आणि विविध भारतीय शॉपिंग आणि फूड बूथ उभारण्यात आले होते. रांगोळी प्रात्यक्षिक, मेंदी बूथने खूप गर्दी खेचली. बँड, बॉलिवूड नृत्य - कार्यशाळा आणि नंतर भारतीय शास्त्रीय आणि उपशास्त्रीय नृत्य सादरीकरण यानी संध्याकाळ उजळून निघाली. शेवटी मंडळाच्या ढोल ताशा पथकाच्या स्थिर वादनाने कार्यक्रम दणक्यात संपला. रविवारची सुरुवात अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तनाने झाली. पारंपरिक पालखीमध्ये गणपती बसवून विसर्जन मिरवणुकीला दुपारी सुरुवात झाली. ढोल ताशाच्या गजरात आणि "गणपती बाप्पा मोरया"च्या जयघोषात डाउनटाउन'मधून मिरवणूक नदीच्या दिशेने निघाली. साधारणपणे दोन तास नृत्य आणि जल्लोषानंतर, नदीकिनाऱ्यावर उत्तरपूजा आणि आरती करून, गणपती बाप्पाचे नदीमधे विसर्जन करण्यात आले.

मंडळाने उत्सवाच्या दरम्यान चित्रकला, मेंदी, नेल- आर्ट, फूड-आर्ट अशा विविध स्पर्धाही घेतल्या. मुलांसाठी अथर्वशीर्ष पठण आणि मुले व प्रौढांसाठी गीता अध्याय पठण स्पर्धा होत्या. जवळजवळ सहा महिन्यांचे नियोजन आणि स्वयंसेवकांचे अथक परिश्रम यामुळे हा उत्सव अत्यंत यशस्वी झाला. मंडळाच्या फेसबुक पेज आणि यूट्यूब चॅनेलवर अधिक फोटो आणि व्हिडिओ जरूर पहा. **www.columbusganesh.com**

***

## पीओरीया (इलिनॉय) येथील गणेशोत्सव
## जनसेवा अन् ईशसेवा

- **दीपश्री फाटक-शेटजी , गौरी कुलकर्णी** (पीओरिया, इलिनॉय)

पीओरीया हे इलिनॉय नदीकाठी वसलेल छोटं शहर! लोकसंख्या साधारणपणे १००,०००. शिकागो पासून ३-३.५ तास ड्राईव्हिंग अंतरावर असलेल्या ह्या शहरात इलिनॉय राज्यातील सर्वात पहिली युरोपियन सेटलमेंट झाली. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस पीओरीयाला microcosm market म्हणून ओळखले जायचे. याचे कारण, इथे स्थायिक जनता अमेरिकन संस्कृती, मूल्यें, आणि परंपरा दर्शवणारी होती. "Will it play in Peoria?" ही उक्ती त्यामुळेच प्रसिद्ध आहे. याच पीओरीयामध्ये एक -

लहानसं मराठी मंडळ उत्साहाने कार्यरत आहे. दरवर्षी येथील मराठी मंडळातर्फे स्थानिक 'हिंदू टेम्पल ऑफ सेंट्रल इलिनॉय' मंदिरात गणेशोत्सवात प्रसाद-भोजन दिलं जातं. यंदाचं हे २०वे वर्ष! दरवर्षी गणपती दर्शनाला येणारे साधारणपणे ४००-६०० भक्त ह्या प्रसाद-भोजनाचा आस्वाद घेतात. २०१९ ला तर ही आकडेवारी ७५० होती! यंदा कोव्हिडची परिस्थिती लक्षात घेता मंदिरात येणाऱ्या भक्तगणांना बॉक्स-लंच देण्याचं आमच्या मराठी मंडळाने ठरवलं. जेवणाचा बेत होता, मसाले भात, बुंदी रायतं, वांगी-बटाटा भाजी, पोळी, बटाटा वडा, गोड शिरा, जिलबी आणि मोदक! ह्यातले पोळ्या आणि जिलबी वगळता सर्व पदार्थ मंदिराच्या स्वयंपाक-घरात दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्यकर्त्यांनी करायचे ठरले, पण कोव्हिड संदर्भातले सोशल डिस्टन्स आणि मास्कचे नियम पाळूनच. पूर्वी इथल्या स्थानिक महिला प्रत्येकी २०-३० पोळ्या घरून करून आणत, पण सध्या तयार पोळ्या बाजारातून आणल्या जातात. भोजनातल्या प्रत्येक पदार्थ करणाऱ्या कार्यकर्त्यांची यादी आणि त्याचे गट निर्माण केले जातात. मसाले-भात टीम, वांगी- बटाटा-भाजी टीम, शिरा टीम, मोदक टीम, इत्यादी... अशी कार्यक्रमाची आखणी होते.



गेली २० वर्षे चालत आलेल्या ह्या परंपरेमुळे किती लोक येणार, किती जिन्नस लागणार, कुठून आणि किती प्रमाणात जिन्नस आणायचे ह्या सर्वांचे नेमके अंदाज ठरलेले असतात.

कोव्हिडची परिस्थिती लक्षात घेता ३००-३५० लोकांचा अंदाज होता पण यंदा ह्या विघ्नहर्त्याच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांची रीघ अगदी दुपारपर्यंत लागली आणि सुमारे ४००-४५० भक्तांना प्रसाद -भोजन देण्याचं भाग्य मराठी मंडळाला लाभलं. **(For more photos Click HERE.)** प्रसाद-भोजनानंतर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मंदिराच्या स्वयंपाक-दालनाच्या सफाईचे कामही मोठ्या आनंदाने पार पाडलं. बॉक्स-लंचच्या या वितरणातून मिळालेला $३२०० रक्कमेचा निधी मंदिराच्या कार्यासाठी मंडळातर्फे देणगी म्हणून देण्यात आला. सर्वांनी एकत्र येऊन साथीने आयोजित होणाऱ्या ह्या परंपरेचं मोल खूप आहे.

अशीच ही परंपरा वर्षानुवर्षे पीओरीयामध्ये चालत राहो, अशी ह्या गणरायाला मनापासून प्रार्थना! बाप्पा मोरया!

***

## फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळ - गणेशोत्सव २०२१

**- समीर कवळेकर** (फिनिक्स, ॲरिझोना)



दर वर्षी एकत्र येऊन गणपती साजरा करणारे आपण, गेल्या वर्षी पासून 'ऑनलाईन' ह्या नव्या माध्यमाने तो साजरा करायला लागलो. प्रत्यक्षात भेटण्याची मजा वेगळीच असली तरी ह्या प्रकारानेही काही नवीन गोष्टी आपल्या सगळ्यांना शिकवल्या.

गणपती म्हणजे लहान मुलांचा प्रिय मित्र. पण त्यांच्या स्वास्थ्य सुरक्षेसाठी फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळाने २०२१ मध्ये सुद्धा गणपतीचा सोहळा ऑनलाईनच ठेवला. **(फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळातील काही सदस्यांनी केलेली गणपती-सजावट पाहण्यासाठी- Click HERE.)**

नेहमीप्रमाणेच शनिवारी आणि रविवारी ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रमांची धम्माल तर होतीच पण सलग दहादिवस घरोघरच्या आरत्यांना पण फिनिक्सच्या गणपतीप्रेमी मंडळींनी उत्साहाने प्रतिसाद दिला.

ह्या वेळेचा फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळातील सांस्कृतिक कार्यक्रमांचा विषय होता, नातीगोती आणि महाराष्ट्राची देवस्थाने! ह्या वेगळ्या पद्धतीने अनेक बाल, युवा, आणि प्रौढ कलाकारांनी आपली कला गाणी, नृत्य, कथाकथन आणि नाटक प्रस्तुत केले आणि इतरांनी त्यांचा आनंद घेतला. कार्यक्रम ऑनलाईन असल्यामुळे ह्यात अनेकांना सहभागी होता आले.

ह्या व्यतिरिक्त, मंडळाने २१ वेळा अथर्वशीर्षपठनाचेही आयोजन केले. रविवारची सकाळ एकदम मंत्रमुग्ध आणि मंगलमय वातावरणांत गेली. सहा कुटुंबांनी २१आवर्तने करत सुमारे एक तास हा कार्यक्रम रंगवला. गणरायाला सुद्धा नक्कीच पोचला असेल हा भाव; पण तोपर्यन्त दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. एकाच मंडपात जेवायची मजाच निराळी असते, पण सोशल डिस्टन्स पाळायचे कसे?, म्हणून मग मंडळाने घरोघरीच जेवण पोचवायचे ठरवले. मसाले-भात, उसळ, श्रीखंड-पुरी, बटाटावडा आणि मोदक असा मराठमोळा बेत! एक उत्तरेला आणि एक दक्षिणेला अशी दोन ठिकाणावरून जेवणाचे वाटप करण्यात आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अतिशय उत्तम पद्धतीने आपली जबाबदारी पार पाडली. आणि त्याची पावती अनेकांकडून आलेल्या ईमेलमधून मिळाली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असे म्हणत, पुढच्या वर्षी एकत्र येऊन गणपती महोत्सव साजरा करू ह्या आशेतच सगळ्यांनी यंदाही गणपती बाप्पाचा निरोप घेतला.

***

## सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळाचा गणेशोत्सव

**- तेजश्री सौरभ मगदूम** (सॅन अँटोनियो, टेक्सस)

नमस्कार मंडळी !

केलं का गणपती बाप्पाला बाय बाय ?

आम्ही म्हणजे आमच्या सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळानेही बाप्पाचा निरोप घेतला, तो पुन्हा पुढच्या वर्षी लवकर भेटण्याच्या बोलीवरच! आपल्या मातीपासून, घरच्यांपासुन लांब आलेले आपण सगळे आपल्या मायभूमीची आठवण सोबत घेऊन राहतो. त्यामुळेच सर्व भारतीय बांधवांसोबत सगळे सण एकत्रित येऊन समारंभपूर्वक साजरेही करतो. तसं तर आता अमेरिकन लोकांनाही आपल्या सोबत बरेच सण साजरे करताना आपण पहातो. आमच्या मराठी मंडळाला गणेशोत्सवासाठी टॉम क्लर्क शाळेची दारं उघडी करून देणाऱ्या शाळेच्या अमेरिकन कर्मचाऱ्यांनीही ह्या उत्सवाचा जल्लोष अनुभवला.



या वेळच्या गणेशोत्सवाचा रंग काही वेगळाच होता नाही का? एक-दिड वर्षाच्या गृहकैदेनंतर एकत्रित साजरा केलेला हा पहिला मराठी सण. यावेळेस आमच्या मंडळाच्या बाप्पाचे आगमन 'गर्जना' करत झाले. अहो म्हणजे, यंदा आमच्या मराठी मंडळाचं स्वतःचं ढोल-ताशा पथक तयार झालंय, आहात कुठे? यात ढोलवर थाप देणारे हात फक्त फेटेवाल्यांचेच नव्हते बरं का, नथ घातलेल्यांचे पण अगदी तोडीस तोड होते. ढोल- ताशा - झांज - लेझीम सगळंच अगदी जमून आलं होतं. "धतर ततर ततर..."च्या तालावर नाचत सगळ्यांनी बाप्पाचं स्वागत केलं. अहाहा, काय तो जोश, काय ती ऊर्जा, काय तो उत्साह.. अनुभवण्यासारखा होता !

शाळेच्या ऑडिटोरियमच्या स्टेजवर प्रतिस्थापनेची पूजा, आरती मनोभावे झाली. मान्यवरांचे स्वागत, सत्कार, आभार आणि मंडळाच्या नवीन समितीने जुन्या समितीचे सत्कार केले. आलेल्या पाहुण्यांचंही मनोगत व्यक्त करून झालं. आणि विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सुरू झाला. आपापल्या अंगातील कलागुणांनी मंडळातील सदस्यांनी उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले.

या सर्वात कोव्हिडला विसरून कसं चालेल, मुळीच नाही! जास्तीत जास्त कार्यक्रम मास्क लावून पार पडेल, याची मंडळाच्या सभासदांनी काळजी घेतली. बाप्पाच्या दर्शनाच्या रांगेतही सर्वांनी काळजी घेतली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना पोटातल्या कावळ्यांची आठवण झाली आणि सर्वांचे पाय शाळेच्या कॅफेटेरियाकडे वळले. मस्तं गोड मऊ मोदक आणि त्यावर तुपाची धार, मसाले भात आणि ताक, मटकीची उसळ, बटाट्याची भाजी, चपाती... मम्मम्म... अजूनही आठवलं तरी, तोंडाला पाणी सुटतंय. झक्कास बेत! जेवण असो वा बाप्पाची आरास, 'एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या बोलीप्रमाणे छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या सहकार्याने हा गणेशोत्सव निर्विघ्न पार पडला. शेवटी बाप्पाकडे सर्वांची एकच विनंती होती, 'निरोप घेतो देवा आम्हा आज्ञा असावी, चुकले अमुचे कांही, त्याची क्षमा असावी.'

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या !

***

# 'सिॲटलकरांनी' केले बाप्पाचे जोरदार स्वागत!

**- गायत्री हर्डीकर** (सिॲटल, वॉशिंग्टन)

'सिॲटल महाराष्ट्र मंडळाचा' या वर्षीचा 'गणेशोत्सव' दणक्यात साजरा झाला. खर, तरं कोव्हिड नंतरच्या काळात प्रत्यक्ष सहजरित्या भेटणं खूपचं कठीण होऊन गेलं होतं. आणि त्याचवेळी खऱ्या अर्थाने एकत्र येणं, भेटीगाठी होणं, एकत्र येऊन कोणताही सण साजरा करणं यात किती मजा असते, आनंद असतो आणि त्या सगळ्या गोष्टी आपल्या आयुष्यात किती महत्त्वाच्या आहेत हे अधिक प्रकर्षाने जाणवले. यावर्षी सुदैवाने तो प्रतिक्षेचा काळ संपला आणि कोव्हिडच्या सगळ्या नियमांचे पालन करून सिॲटलकरांनी गणरायाचे एकत्र भेटून स्वागत केले. एक वेगळ्याच प्रकारचा उत्साह, जल्लोष, आनंद वातावरणात जाणवत होता.

१८ सप्टेंबरला 'रेडमंड' इथल्या 'वेदा' मंदिराच्या बाहेरील आवारात या वर्षीचा 'सिॲटल महाराष्ट्र मंडळाचा' गणेशोत्सव साजरा झाला. सकाळी ढोल ताशा, लेझीम आणि नृत्य अशा बहारदार मिरवणूकीत बाप्पाचं स्वागत करण्यात आलं. या मिरवणुकीत लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत अनेकजण सहभागी झाले होते. सादर करणारी मंडळी मराठमोळ्या पारंपारिक वेषात उठून दिसत होती. सर्व प्रेक्षकांना सुद्धा या मिरवणुकीने ताल धरायला लावला. अशा जोषात व उत्साहात गणेशोत्सवाची सुरुवात झाली. यांनतर प्राण-प्रतिष्ठापना, आरती व अथर्वशीर्ष पठण करण्यात आलं.



यंदाच्या गणेशोत्सवात आणखीन एक विशेष आकर्षण होतं, 'हस्तकला स्पर्धेचं'. या स्पर्धेचा विषय 'महाराष्ट्राची संस्कृती' असा होता. यामध्ये अगदी खाद्यसंस्कृती, नृत्य, लोककला अशा महाराष्ट्राची संस्कृती दाखवणाऱ्या ३डी वस्तू कुटुंबाने एकत्र येऊन तयार करायच्या होत्या. यात मंडळातल्या अनेक कुटुंबांनी सहभाग घेतला. आणि ते आर्ट पिसेस गणेशोत्सवात एक सजावटीचा भाग म्हणून ठेवण्यात आले होते. महाराष्ट्राची संस्कृती दाखवणारा ३६० डिग्री वूड लॉग आर्ट एका कुटुंबाने तयार केला होता तर एका कुटुंबाने महाराष्ट्रातल्या विविध परंपरा आणि पद्धती यासंबंधी क्ले आर्ट तयार केले होते. याशिवाय अष्टविनायक क्ले आर्ट, गुढीपाडवा साजरा करणारी मराठी बाहुली, पैठणीचे कॅनव्हास पेंटिंग, पंढरपूरची वारी आणि वारकरी शिवाय विठोबा रखुमाई, पादुका पालखी, वारली पेंटिंग, क्रोशेच्या वस्तू असे वैविध्यपूर्ण आर्ट पिसेस त्या ठिकाणी ठेवण्यात आले होते. तरुणांना मराठी संस्कृती कलेच्या माध्यमातून समजून घेता यावी, त्यांनी यात कुटुंबांच्या मदतीने सहभाग घ्यावा, हा हेतू या हस्तकला स्पर्धेमागे होता.

'सिॲटल महाराष्ट्र मंडळाने' आणि गणेशोत्सव साजरा करायला आलेल्या सर्वांनी कोव्हिडचे सर्व नियम पाळून मिरवणूक, हस्तकला स्पर्धा या सर्व ठिकाणी उदंड प्रतिसाद देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. व सर्वांनी महाराष्ट्रीयन पद्धतीच्या 'पॅक्ड्-फूड' चा आस्वाद घेतला.

आरती आणि अथर्वशीर्ष पठणाने एक सकारात्मक व मंगलमय वातावरण तयार झाले होते.

***

# असा झाला टोरांटो (कॅनडा) मधील गणेशोत्सव!

**- शुभदा वकनळ्ळी** (टोरांटो, कॅनडा)

काळोखी रात्र हळूहळू संपुष्टात येऊन नवीन आशा घेऊन येणारी पहाट उगवावी त्याप्रमाणे कोरोनाचं सावट किंचित बाजूला सारून भाद्रपदातील संकष्टी चतुर्थीच्या दिवशी आपल्या मंगलमूर्तीचं आगमन झालं. मराठी भाषिक मंडळ, टोरांटो आणि टोरांटो मधील गणेशपूजनासाठी वाहून घेतलेली एक सेवाभावी संस्था 'श्री गणेश याग परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. १० सप्टेंबर २०२१ रोजी गणेशोत्सव हिंदू हेरिटेज सेंटर येथे श्री. विद्युत जोशी गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्साहात साजरा झाला. सकाळी मुहूर्तानुसार श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठापना केली गेली. संध्याकाळी भाविकांच्या सोयीसाठी पुन्हा ढोल-ताशांच्या गजरात श्रींचं आगमन, अभिषेक, पूजा आणि २१ वेळा अथर्वशीर्ष पठण करण्यात आलं. अपेक्षेप्रमाणे मंडळाच्या अनेक भाविकांनी प्रत्यक्षरीत्या हजेरी लावली. सर्वांनी सोशल डिस्टन्सिंग, मास्क, यांचं काटेकोर पालन केले.

टोरांटोच्या मराठी भाषिक मंडळाच्या परंपरेप्रमाणे आरत्यांचा अतिशय शिस्तबद्ध व भक्तिपूर्ण गजर, महाआरती, बाप्पाचं दर्शन, तीर्थ, प्रसाद यांनी भक्तगण अगदी तृप्त होऊन गेले.



दुसऱ्या दिवशी त्याच स्थळीं बाहेर मंडप घालून 'श्री गणेश याग परिवार'च्या प्रथेप्रमाणे शास्त्रशुद्ध पद्धतीने गणेश हवन करण्यात आलं. हवामान अतिशय अनुकूल होतं, मंद सात्विकता भरून राहिली होती. त्यानंतर गणेश विसर्जन पूजा साग्रसंगीत पार पडली आणि प्रसादाचं जेवण जेऊन तृप्त मनाने बरीचशी मंडळी आपापल्या घरी परतली. त्यानंतर गुरुजी, यजमान आणि काहीमंडळींनी शाडूच्या पर्यावरणूरक गणपतीबाप्पाचे विसर्जन 'क्रेडिट व्हॅली'-नदीत अगदी काळजीपूर्वक करून बाप्पाला निरोप दिला.

रविवार दि. १२ सप्टेंबर सकाळी ९ ते १० ह्या वेळात अखंड अथर्वशीर्ष पठण करण्यात आले. टोरांटो मंडळाच्या या उपक्रमाला अनेक गणेशभक्तांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. प्रसाद करंबेळकर गुरुजींनी याचे संचलन केले.
गणपती बाप्पाची ६४ कलांचा अधिपती ही ओळख सार्थ करण्यासाठी मंडळाने आयोजित 'श्री वसंत कानेटकर जन्मशताब्दी महोत्सव पुष्प पहिले' ह्या कार्यक्रमांतर्गत टोरांटो मधील स्थानिक कलाकारांनी नाट्यसंगीताचा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर श्री. कानेटकर यांच्या स्नुषा आणि नातू यांनी त्यांच्या काही हृद्य आठवणी सांगितल्या आणि प्रेक्षकांना पुन्हा एकदा त्या सुवर्णकाळाची सुखद सफर घडवली.

प्रत्येक सोहोळ्याचे थेट प्रक्षेपण मंडळाच्या फेसबुकवरून करण्यात आले. त्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना हा संपूर्ण सोहोळा घर-बसल्या पाहता आला. यूट्युबर हा कार्यक्रम https://youtu.be/9E1onjxVJB8 या संकेतस्थळावर कधीही पाहता येईल. अशा प्रकारे २०२१ सालचा मराठी भाषिक मंडळ टोरांटो'चा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि सकारात्मक वातावरणात पार पडला.

***

## चित्र-कल्पना

**- शीतल रांगणेकर (लॉस अँजलीस), विनता कुलकर्णी (शिकागो)**




## बृहन्महाराष्ट्र वृत्त पुरवणी ऑक्टोबर २०२१ - ई विभाग - (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

- **गणेशोत्सव:-काही क्षणचित्रे**
- **उत्तररंग सत्र : -**
**विषय- आठवणी माझ्या गावाच्या**
- **For Kids:- Game: Bigger than Big-By Rajiv Tambe** (Pune)
**वाचण्यासाठी संकेतस्थळ**:-
**Click:- HERE or Visit**
**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

- **BMM Yuva-Vani:- October 2021**
**Click HERE or Visit-**
**https://bmmonline.org/yuva-vani-archives/**

- **राशिभविष्य:- ऑक्टोबर २०२१ - द्वारा-**
- **दादा दामले** (न्यू जर्सी)
**वाचण्यासाठी संकेतस्थळ**:-
**Click:- HERE or Visit-**
**https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
**संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व **फोन क्र**. 1-216-926-6696 **ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी** - अध्यक्षा, बृ. म. मंडळ **फोन क्र**. 1-224-321-2948 ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

.............................................................................

## उत्तररंग सत्र क्र. ६७ - ऑगस्ट २८, २०२१
## आठवणी माझ्या गावाच्या

**अहवाल: स्मिता कंटक** (विल्मिंग्टन, डेलावेअर)



हे सत्र आजवरच्या सर्व सत्रांपेक्षा आगळेवेगळे म्हणावे लागेल. बावीस वक्त्यांचा सहभाग लाभलेल्या या सत्राने, सांगली जिल्ह्यातील छोट्याशा कोकरूड गावापासून थेट न्यूझीलंडपर्यंत अनेक गावांच्या आठवणींनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकले. जणु काही आम्ही सर्वजण त्यांच्याबरोबर एका अनोख्या सफरीवर जाऊन आलो.

१९४० - १९९० या काळाची ही सफर तीन तास चालली होती, आणि तरीही ती संपूच नये असे सर्वांनाच वाटत होते. "गुण गाईन आवडी" अशा जिव्हाळ्याने सांगितलेली आपापल्या गावांची वर्णनं, थोडा इतिहास, थोडा भूगोल तर या सफरीत होताच. पण त्याबरोबर होत्या सुगंधासारख्या दरवळणाऱ्या आठवणी- बालपणीच्या, घराच्या, मैत्रीच्या, आप्तांच्या, शाळांच्या, निसर्गाच्या, तशाच महत्त्वाच्या सामाजिक घटनांच्या आठवणी.

काही अपरिचित गावांबद्दल ऐकताना पुष्कळ नवीन माहिती समजली. मालवणी, अहिराणी भाषांची झलक ऐकायला मिळाली. मुंबई-पुण्यासारख्या शहरांचीसुद्धा, "माझं गाव" अशी आपुलकीने, नव्याने ओळख झाली. काही वक्त्यांनी स्लाइड्सद्वारे चित्रांची जोड दिल्यामुळे आठवणी जिवंत होऊन, त्या त्या काळच्या समाजजीवनाची एक एक खिडकी उघडल्याचा भास होत होता. आज स्मार्टफोनच्या जमान्यात कल्पना करणं कठीण, अशा अडचणींना सामोरं जाण्याचे, जीवनमूल्यं जपण्याचे अनुभव ऐकून प्रेक्षकांची मने भारावून गेली. स्मरणरंजनाचा आनंद लुटून, झूमवर सतत टिप्पणी लिहून आठवणींमध्ये उत्स्फूर्त भर टाकली जात होती. या सत्रातील वक्ते आणि त्यांनी जागवलेल्या आठवणींची गावे खालील प्रमाणे:

| आठवणी माझ्या गावाच्या - वक्ते | | आठवणी माझ्या गावाच्या - वक्ते | |
|---|---|---|---|
| १. विजय सबनीस | सिंधुदुर्ग | १२. लीना बागवदे | मुंबई पुणे |
| २. मीना दीक्षित | बीड | १३. सुप्रिया भट | औरंगाबाद |
| ३. शिवदास पै | गिरगांव | १४. नीला इनामदार | आरवली |
| ४. शीला सोगल | इंदौर | १५. विवेक पाटील | कोकरूड, सांगली |
| ५. अशोक सप्रे | देवरूख | १६. अनघा देव | महाड |
| ६. सुधीर काळे | जमखंडी | १७. मनीषा देशपांडे | सावनेर, नागपुर |
| ७. सुनील सूर्यवंशी | मुल्हेर | १८. मीनल धामणकर | ठाणे |
| ८. शीतल लोटलिकर | कारवार | १९. तन्मयी दीक्षित | विक्रोळी |
| ९. रजनी शेंडुरे | सातारा | २०. शशांक नेने | न्यु प्लीमथ, न्यु झीलंड |
| १०. नंदिनी गरुड | पानशेत (पुणे ) | २१. रवी गावकर | ओपा, गोवा |
| ११. प्रिया शिलोत्री | विले पार्ले | २२. विद्या हर्डीकर सप्रे | पुणे |

**टीप:-** बृ.म. मंडळाच्या उत्तररंग विभागाने आयोजित वरील सत्रामधील **काही** वक्त्यांनी सादर केलेल्या 'आठवणी माझ्या गावाच्या' बृहन्महाराष्ट्र वृत्त पुरवणी ई विभागात समाविष्ट केल्या आहेत. **वाचण्यासाठी संकेतस्थळ:-**
**https://bmmonline.org/vrutta-supplements/** **Or Click:- HERE**

***

# Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status.

An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape.

India recipients of your giving need not be a registered charity.
Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.
FSC is the answer.
For more details-
Visit our Website "WWW.SmallCharity.Org"
Or
Email to Admin@SmallCharity.Org
You will hear from:
Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801
Cell: 347-232-8668
Join Donor List:

| | |
|---|---|
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATION |
| KIRAN NANDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| MUKUND SHAILA DIDOLKAR | EDUCATIONAL FOUNDATION |
| SUBHASH SUHASINI PURANIK | CASP, PATHAK TRUST |
| RAHUL PUNAM MUTHA | ANAND RISHI HOSPITAL- AHMADNAGAR MH |
| KASI& GEETHA GABBITA | NIH, INDIA |
| ANDREW LEDERER | BUILDASCHOOLININDIA.COM |
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | MADHAV NAGARKAR, SWAROOP YOG |
| KOTESWARA RAO KUNDA MD | GUNTUR AP EDUCATIONAL FOUNDATION |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address**
**BMM Newsletter**
**3574 S. Marion Way**
**Chandler, AZ 85286**


**दसऱ्यासाठी पुरणाची पोळी आणि दिवाळीसाठी फराळ यासाठी अमेरिकेतील लोकप्रिय नाव**

**रानडे फूड्स, ऑडिओ, पुस्तके व गिफ्ट्स**

**आपली ऑर्डर १७ ऑक्टोबर पर्यंत नोंदवा**

**कॅटलॉगसाठी या क्रमांकावर whatsapp मेसेज पाठवा +१ २६७ ९८१ ७१७०**

---

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या ह्यूस्टन ते डॅलस अधिवेशनातील कार्यक्रम ऑडिओ आणि व्हिडिओवर**

**कॅटलॉगसाठी या क्रमांकावर whatsapp मेसेज पाठवा +१ २६७ ९८१ ७१७०**



## HEALTH INSURANCE

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

* VISITORS
* H-1 B VISA HOLDERS
* PERMANENT RESIDENTS

( Some restrictions apply)

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**
E-mail: padmaja.p.bapat@gmail.com
Website: **visitors-insurance.com**